Review Of Research
Vol. 4 | Issue. 3 | Dec. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# मराठी स्त्री – आत्मचरित्रे (1975 ते 2000) : 'स्त्री–सन्मान' व 'स्त्री–स्वातंत्र्यविचार' या दृष्टीने शोध

डॉ. प्रतीक्षा गंगावणे
मराठी विभागप्रमुख , पेमराज सारडा महाविदयालय, अहदमनगर.

1975 पूर्वी आंग्ल काळात व स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रीविषयी मोठ्या प्रमाणावर चर्चा झालेली दिसते. या चर्चेचा परिणाम स्त्री जीवनावर होणे स्वाभाविक होते. आधुनिक काळात जे समाजपरिवर्तन झाले, त्यात स्त्री–सन्मान, स्त्री – स्वातंत्र्य, स्त्री–समता, स्त्री–मुक्ती यासदंर्भातील विचार प्रमुख होता असे दिसून येत. या कालखंडात शैक्षणिक व औद्योगिक प्रगती झपाट्यानें आणि मोठ्या प्रमाणावर झाली. त्याचा परिणाम सांस्कृतिक आणि सामाजिक घटकांवरही झाला. शैक्षणिक प्रगतीबरोबरच सामाजिक प्रबोधनकारांनी आपापल्यापरीने स्त्रियांच्या संदर्भात विचार मांडलेले दिसतात. याच विचारांना अनुसरुन काही चळवळीही झालेल्या दिसून येतात. याचाच परिणाम म्हणजे शिक्षणक्षेत्रात, व्यवसायक्षेत्रात, नोकरीक्षेत्रात व राजकीय क्षेत्रातही स्त्रियांची संख्या लक्षणीय वाढली. स्त्रीविषयीच्या विचारांमधून स्त्री जीवनाला मार्गदर्शन, प्रेरणा, बळ मिळालेले दिसते. परिणामतः त्याच आधारावर स्त्रियांचे जीवन बदलते रंग व बदलती रुपे घेऊन प्रकटले. हे प्रगटीकरण 1975 ते 2000 या कालखंडात लक्षणीय स्वरुपात झालेले दिसते. त्याचेच चित्र आत्मचरित्रातून उमटलेले दिसते.

महात्मा फुले, ताराबाई शिंदे, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महर्षी कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अगदी अलीकडे उदयास आलेला स्त्रीवादी विचार या सर्वांनी आपापल्यापरीने स्त्री–सन्मान, स्त्री स्वातंत्र्य, समता व मुक्ती यासंदर्भात विचार प्रकट केले आहेत. बहुतेक विचारवंतांनी भारतीय सांस्कृतिक जडणघडणीचा उल्लेख करताना मनुस्मृतीवर प्रहार करीत विचार व्यक्त केले आहेत. या सर्व विचारवंतांचा, त्यांच्या विचारांचा समान स्त्रोत पहावयास मिळतो. त्यात ...

(1) स्त्रीला पुरुषांप्रमाणेच सन्मानपूर्वक वागविले गेले पाहिजे, तिचा प्रपंच, व्यवहार, राजकरण यांसह सर्व क्षेत्रांत सन्मानाचे स्थान असले पाहिजे.
(2) स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्तव असते, हे मान्य करुन तिला व्यक्तिस्वातंत्र्य असले पाहिजे.
(3) स्त्रीला पुरुषांच्या तुलनेत समानतेने सर्व क्षेत्रात अवसर व स्थान प्राप्त झाले पाहिजे.
(4) स्त्रीला लिंगभेदावर आधारित पुरुषांच्या तुलनेत दुय्यम स्थान मिळता कामा नये.

अशा या चार मुद्यांवर सर्व विचारवंतांचे एकमत झालेले दिसून येते. या प्रबोधनाने, विचारांनी स्त्रियांच्या मनात आत्मपरिक्षणपूर्वक अनेक प्रश्न स्त्री–सन्मान, स्वातंत्र्य, समता व मुक्त यासदंर्भात निर्माण

केले. 1975 ते 2000 या कालखंडातील स्त्रियांची आत्मचरित्रे ही 20 व्या शतकातील सांस्कृतिक पार्श्वभूमीचे प्रतिनिधित्व करित असली तरी यांच्या सिंहावलोकनाला ताराबाई शिंदे, म. फुले, आगरकर, कर्वे, शिंदे यांच्या विचारांबरोबर स्त्रीवादी विचारानेही धार आली. अशा परिस्थितीत स्त्री–आत्मकथने, स्त्रीजीवनाचे कोणते दर्शन घडवतात ? याचा शोध परिर्वतन प्रक्रियेच्या दृष्टीने महत्वाचा ठरतो. मराठीतील स्त्री – आत्मचरित्रे लेखनामगे उपरोक्त विचारवंतांची प्रेरणा आहे, हे प्रस्तुत कालखंडाचा विचार करता ध्यानात येते.

## 'स्त्री–सन्मान' , 'स्त्री–स्वांतत्र्य,' 'स्त्री–समता' व 'स्त्री–मुक्ती' यासंबंधीचे विचार

सांस्कृतिकदृष्टया कुटुंबव्यवस्थेत, समाजव्यवस्थेत, लोकव्यवहारात, राज्य–व्यवहारात, धर्मव्यवहारात, कलाक्षेत्रात, न्यायव्यवस्थेत आणि शिक्षणक्षेत्रात स्त्री कोणत्या प्रकारे सहभागी होते, तिला पुरुषांच्या तुलनेत स्वतंत्र व्यक्तिमत्व मानून सन्मानपूर्वक विचार केला जातो किंवा नाही, हे पाहणे म्हणजे स्त्रीसन्मानाचा विचार होय. अव्वल इंग्रजीच्या काळापासून विविध सुधारणावादी संस्था, लोकधुरीण यांनी वेळोवेळी स्त्रियांचा वरील सर्व क्षेत्रात सन्मानपूर्वक विचार केला पाहिजे. त्यांचे विचार वरील सर्व क्षेत्रांच्या दृष्टीने पुरुषांच्या तुलनेत समानतेने महत्वाचे असतात, असे विचार व्यक्त केलेले दिसतात. स्त्रीला वरील सर्व क्षेत्रात पुरषांच्या तुलनेत समानतेने विचारात घेणे म्हणजे स्त्री सन्मानाचा विचार होय. याचाच अर्थ स्त्री आणि पुरुष यांच्यात माणूस म्हणून वैचारिकदृष्टया कोणताही भेद न मानणे म्हणजेच ''स्त्री – सन्मान'' होय.

अशा प्रकारचा स्त्री–सन्मान साध्य होण्यासाठी स्त्री– स्वातंत्र्य व समतेचा विचार महत्वाचा ठरतो. वर उल्लेखिलेल्या कुटुंबव्यवस्थेत, समाजव्यवस्थेत, लोक–व्यवहारात, राज्यव्यवहारात, धर्मव्यवहारात, कलाक्षेत्रात, न्यायव्यवस्थेत आणि शिक्षणक्षेत्रात स्त्रीला मोकळेपणाने पुरुषांच्या बरोबरीने सहभागी होण्यास मान्यता देणे म्हणजे स्त्री–स्वातंत्र्य व समतेचा विचार होय. यासाठी प्रमुख्याने पुरुषांच्या बरोबरीनें सर्व क्षेत्रातील शिक्षण स्त्रीला मिळावे, तिला कुटुंबाबाहरील सर्व क्षेत्रांत मनाप्रमाणे, अधिकारवाणीने आत्मविश्वासाने सहभागी होण्याचे स्वांतत्र्य असावे, तसेच कुटुंबात, कौटुंबिक जीवनातील जबाबदा–यांच्या संदर्भात पुरुषांच्या बरोबरीने सन्मापूर्वक वर्तनाचे व निर्णयाचे स्वातंत्र्य देणे म्हणजे '' स्त्री–स्वांतत्र्य व समतेचा विचार'' होय किंवा, '' स्त्री–स्वातंत्र्य व समतेचे तत्व'' होय.

''स्त्री–मुक्तीविचार'' व स्त्रीवादी विचार हे अलीकडील काळात म्हणजेच 1960 नंतर प्रकट झालेले दृ ष्टिकोन किंवा स्त्रीजीवनविषयक मते ही पुरुषप्रधान संस्कृतीच्या संदर्भात प्रतिक्रियात्मकतेने निर्माण झालेले मते होय. या मतांतून संघर्षात्मकतेने स्त्रोने पुरुषप्रधानतेतून मुक्त होऊन आपल्या सामाजिक जीवनामध्ये स्त्रीप्रधानता आणण्याचा प्रयत्न करण्याची भूमिका स्पष्टपणाने घेऊन त्यासाठी चळवळीचे किंवा आंदोलन साधन स्वीकारलेले आहे.

वरील ''स्त्री–सन्मान, स्त्री–स्वातंत्र्य व समता'' या विचारांत स्त्री–पुरुष समानतेच्या दृष्टीने प्रक्रियात्मक उत्क्रांतीचा विचार आहे, हे स्पष्टपणे जाणवते, तर स्त्रीमुक्ती व स्त्रीवादी भूमिकांमध्ये क्रांतिकारकतेने बदल करण्याची भूमिका घेतली आहे, असे जाणवते. हाच मूल्यात्मक भेद 1975 ते 2000 या कालखंडातील स्त्री–आत्मकथनांमधून व्यक्त झालेला पाहावयास मिळतो. या संदर्भात लोकधुरीण परुष आणि समंजसपणाने, धैर्याने विचार व्यक्त करणा–या स्त्रिया यांच्या विचारांचा संदर्भ घेणे हितावह ठरेल.

## महात्मा फुले

महात्मा फुले यांनी सत्यर्वतन करणा–याविषयी पुढील नियम दिलेले आहेत.

(1)' आपल्या सर्वांच्या निर्माण कर्त्याने एकंदर सर्व प्राणीमात्रांस उत्पन्न केले. त्यापैकी स्त्री–पुरुष हे उभयंता जन्मतःच स्वतंत्र व एकंदर सर्व अधिकारांचा उपभोग घेण्यास पात्र केले आहेत, असे कबूल करणारे, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

(2) स्त्री अथवा पुरुष, जे एकंदर सर्व गावाचे, प्रांताचे, देशाचे व खंडाचे संबंधात, अथवा कोणत्याही धर्मातील स्वतःच्या संबंधात स्त्री आणि पुरुष या प्रकारची आवडनिवड (भेदभाव) न करता या भूखंडावर आपले एक कुटुंब समजून एकमताने एकजुटीने एकमेकांशी सत्यवर्तन करुन राहवे.

## ताराबाई शिंदे

'' जसे एकदा सौभाग्य गेले म्हणजे स्त्रियांनी आपली तोंडे अगदी एखाद्या महान खुन्यापेक्षाही महाजबर अपराध्याप्रमाणे काळी करुन सर्व आयुष्यभर अंधार कोठडीत राहावे, त्याप्रमाणे तुमच्या बायका मेल्या म्हणजे तुम्हीही आपले तोंड काळे करुन दाढ्या . मिशा भादरुन यावेत. जन्मापर्यंत कोठेही अरण्यवासांत का असा तुम्हाला कोणत्या शहाण्या देवाने दाखला दिला आहे, तो दाखवा बरे. जशी स्त्री तसेच पुरुष. तुमच्यामध्ये मोठे अलौकिक गुण कोणते ? तुम्हीच कोण असे मोठे शूर म्हणून देवांनी तुम्हाला इतकी मोकळीक दिली.''

'' एखाद्याची बायको दोन वर्षे आजारी पडली तर हे राजश्री, ही कधी मरेल हो, औषध देऊन कंटाळलो असे म्हणायचे. पण बायको कशीही असो, ती जन – लाजेकरिता करीता तरी असे म्हणणार नाही.

## गोपाळ गणेश आगरकर

'' लौकिक आयुष्य हवेहवेसे वाटावे यासाठी प्रथम कुटुंबरचना स्त्री–पुरुष समानतेवर रचली जावी असे त्यांनी प्रतिपादन केले. मुले फार होणे आणि प्रपंचातील हलकी कामे अवश्य करावी लागणे याचा अपरिहार्य संबंध आहे, असे नाही. हलकी कामे स्त्रियांनीच करावी हा काही ईश्वरी नियम नाही. विवाहाच्या कामी स्त्री – पुरुषांची संमती जितकी आवश्यक आहे तितकीच संमती विवाहाच्या अंमलातही दृष्टीस पडू लागली पाहिजे. तसे जेव्हा होऊ लागेल तेव्हाच स्त्रियांची पुष्कळ विपत्ती टळेल. ''

## महर्षी शिंदे

अस्पृश्य वर्गात मुरळी वाहण्याची चाल होती. मुरळी वाहिलेल्या मुलीला पुढे आपले सारे जीवनच अनीतीने, हालअपेष्टाने काढावे लागे. त्यांनी या भयानक प्रकाराचा शोध –बोध घेऊन यात खितपत पडलेल्या मुली, स्त्रिया यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. यासंदर्भात ते म्हणतात, '' बहुतकरुन ही चाल वांझ बायका आपल्याला मुले व्हावीत म्हणून जे देवभोळेपणाने नवस करत असतात. त्यामुळे किंवा तरुण आणि धर्मभोळ्या बायकांच्या धर्मवेडामुळे अस्तित्वात आली असावी.''

## महर्षी कर्वे

विधवाविवाहाचे कार्य करताना कर्व्यांनी एक खूणगाठ मनाशी बांधली की हे कार्य महत्वाचे आहे आणि त्याने लवकरात लवकर आकार घ्यायला हवा असेल तर जितके लोकमत आपल्या बाजूने करुन घेता येईल, तितके झाले पाहिजे. अशा प्रसंग काही गोष्टी आपल्या मनाविरुध्द, विचारांविरुध्द कराव्या लागल्या तरी हरकत नाही. असे सोवळ्या–ओवळ्यावर कर्व्यांची श्रध्दा नसूनही जुन्या विचारांच्या लोकांकडे कधी जायचा प्रसंगी आला तर त्यांचे मन सांभाळण्याचा प्रयत्न कर्वे करीत. सोवळं–ओवळं पाळीत. विधवा विवाहाला उत्तेजन मिळायचं असेल, तर ठरवलं'. विधवा विवाहात जातीची अट पाळणं प्रारंभी आवश्यक आहे हे त्यांनी ओळखले होते. ''शरीरसंबंधाच्या कामात देशस्थ, कोकणस्थ, कराडे यांच्यापलीकडे तूर्त जाऊ नये. '' अशी एक सूचना कर्व्यांनी केलेली होती.

## मनुस्मृती

मनु अनेकदा स्त्रियांचा व क्षुद्रांचा एकच उल्लेख करतो. (उदा. मनु 5/139) कधी स्त्री व जनावरांचा तो एकत्र उल्लेख करतो. (उदा.मनु 5/130) त्याच्या मते कोणतेही कार्य स्वतंत्रपणे करण्याचा स्त्रियांना अधिकार नाही. म्हणून त्यांनी स्वतंत्र कार्य करु नये. (5/147) स्त्रीच्या जीवनाची इतिकर्तव्यता परवश राहण्यात आहे. पती हा तिचा मुख्य मालक. त्यापूर्वी पिता आणि पतीच्या नंतर पुत्र असे कुणाच्या तरी ताब्यात स्त्रीने राहिले पाहिजे. तिने स्वतंत्रता स्वीकारु नये. (मनु 5/148) पिता अगर त्याच्या संमतीने वडील, भाऊ कोणत्याही पुरुषाला ज्याला अर्पण करील त्याच्या ताब्यात स्त्रीने राहावे. त्याची जन्मभर सेवा करावी. (मनु 5/151) पती वारला तरी त्याची इच्छा मोडू नये. आमरण व्रतस्थ रहावे. (मनु 5/158) पुरुषांनी मात्र पत्नी

वारल्यास नव्यान गृहस्थाश्रम पुढे चालू ठेवावा. यासाठी पुन–लग्न करावे. (मनु 5/168) स्त्रीला नव्याने पती करण्यचा अधिकार नाही. (मनु 5/162) स्त्री स्वतंत्र नाही, तिने नेहमी पुरुषांच्या आधीन असावे. (मनु 9/2) श्रेष्ठ पुरुषांच्या संयोगाने स्त्री श्रेष्ठ होते. (मनु 9/23)

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर

महिलांकरिता भारतीय राज्यघटनेअंतर्गत हमी.

1. कायद्यान्वये महिलांना समानता.
2. लिंग, धर्म, वंश, जात आणि जन्मस्थळाच्या आधारे भेदभाव न करणे.
3. रोजगाराच्या समान संधी.
4. समान कामाकरिता समान वेतन.
5. कार्यासाठी उपयोगी आणि मानवीय वातावरण तयार करणे व प्रसूतीचे फायदे निश्चित करणे.
6. सामाजिक अन्याय आणि शोषणापासून संरक्षण देणे.
7. पंचायती आणि नगरपरिषदांमध्ये आरक्षण देणे.
8. महिलांच्या सन्मानाविरुध्द असलेल्या कारवांयाना आळा घालण.
9. सार्वजनिक स्वास्थ्य सुविधांमध्ये वाढ करणे आणि आहाराच्या स्तरामध्ये सुधारणा करणे.
10. दीन–दुबळया लोकांच्या शैक्षणिक व आर्थिक हिताला बढती देणे.
11. महिला आणि मुलांच्या हितासाठी विशेष तरतूद करणे.

उपरोक्त विचारवंतांचे विचार विचारात घेतले असता, त्यातील ताराबाई शिंदे यांनी प्रथम स्त्री समानतेचा उदगार काढला आहे, असे म्हणता येईल, ताराबाई शिंदे ते गौरी देशपांडे यांच्यापर्यंत अनेक स्त्रियांनी स्त्री–पुरुष समानतेचा विचार सामाजिक, सांस्कृतिक व मानसिकतेच्या संदर्भात केलेला दिसतो. भारतीय परंपरेतील या महिलांचे विचार विचारात घेतले तर त्यांच्या आत्मचरित्रातून भारतीय सांस्कृतिक परंपरा झुगारण्याचा आवेश कोठेही दिसत नाही, असे म्हणता येते. आत्मचरित्रांचा आणि स्त्री–पुरुष समानतेचा विचार मांडताना ताराबाई शिंदे यांच्यासह सर्व भारतीय महिलांनी (मराठीत आत्मचरित्र लेख करणा–या व विचार व्यक्त करणा–या महिला ) स्त्री– पुरुष समानतेचा अर्थ स्त्री – मुक्तीच्या स्वरुपात घेतलेला दिसत नाही, तर घर, संसार, प्रपंच, संस्कृती आणि पारमार्थिक जीवन या सर्व क्षेत्रात स्त्रीला सन्मानपूर्वक वागविण्याची श्रेष्ठ भारतीय सांस्कृतिक परंपरा असल्याचे स्मरण करुन देऊन स्त्रीचे श्रेष्ठत्व, तिचे कौटुंबिक, सामाजिक व सांस्कृतिक स्थान अत्यंत महत्वाचे आहे. हे स्पष्ट करुन रुढीग्रस्ततेविषयी विलक्षण चीड आणि खंत प्रकट केली आहे.

## मराठी 'स्त्री आत्मचरित्रे'

अव्वल इंग्रजीच्या काळापासून 2000 पर्यंत लेखिकांची आत्मचरित्रे पुरुषांच्या तुलनेत विपुल नसली तरी ती मोठया संख्याने आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात स्त्री– सन्मान आणि स्त्री–स्वांतत्र्याविषयी लोकशाही समाज व राज्यव्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर विचार सुरु झालेला दिसतो. स्वांतत्र्यपूर्व काळात सुमारे 150 वर्षांमध्ये स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा विचार तसेच स्त्रियांना सन्मानपूर्वक वागणूक मिळावी, या दृष्टीने विचार सुरु झालेला दिसतो. तो अधिक प्रकर्षाने सतत अधिकाधिक प्रमाणात होत राहिला, असे दिसते. 1975 नंतर तर जागतिक पातळीवर स्त्रीवादी भूमिका उदयास आलेली दिसते. या भूमिकेचा प्रसार व प्रचार चळवळीच्या स्वरुपात होताना आढळतो. 1975 ते 2000 या कालखंडात प्रसिध्द झालेली आत्मचरित्रे, मागील दीडशे –पावणे दोनशे वर्षातील स्त्री–सन्मान, स्वांतत्र्य, समता, स्त्रीमुक्ती , स्त्रीवादी भूमिका या विचारमंथाने कितपत प्रभावी झाली आहेत, हे पाहणे स्त्रीमनाचा या वैचारिक भूमिकेच्या संदर्भात (1960 नंतर) शोध घेण्याच्या दृष्टीने महत्वाचे ठरते. 1975 नंतरच्या आत्मचरित्रे ही स्वातंत्र्य, समता या दृष्टीने स्फोटक उदगार करणारी आलेली आहेत, असे दिसून येते. यामध्ये दलित आत्मकथनांची संख्या मोठी आहे. आत्मचरित्रांची

किंवा आत्मकथनांची एक मोठी लाट प्रामुख्याने या कालखंडात (1960 ते 1985 ) आलेली दिसते. या लेखनाचा परिणाम 1975 ते 2000 या कालखंडातील स्त्रियांच्या आत्मचरित्रावर झालेला दिसून येतो.

### 1975 ते 2000 या कालखंडातील आत्मचरित्रांचे वेगळेपण :

(1) कलावंतांच्या संदर्भातील आत्मचरित्रांच्या बाबतीत कलावंतांच्या स्त्रियांची (पत्नी) आत्मचरित्रे आणि कलावंत स्त्रियांची आत्मचरित्रे अशा दोन भागांमध्ये विचार करतो येतो. '' नाच ग घुमा'' मधील सुलोचना किंवा माधवीबाई 'घुमा' आणि 'आहिल्या ' या दोन प्रतिमांच्या सहाय्याने कलावंत कन्या, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय संस्कारात वाढलेली मुलगी, विधवा, प्रेयसी, पुनर्विवाहिता आणि अखेरीस घटस्फोटिता या रुपात स्वतःच्या जीवनाचा पट मांडते. या जीवनात तिने पांरपारिक चूल आणि मूल नाकारले नाही. स्त्रींच्या निसर्गसुलभ भावना आणि पुरुषांच्या नैसर्गिक भावना आणि वासनांशी प्रचलित सांस्कृतिक रुढीग्रस्त वर्तुळात तडजोड करीत स्त्री, प्रेयसी, पत्नी आणि प्रामुख्याने माता म्हणून संघर्षात्मक त–हेने आणि तरी अबोलपणाने जीवन कंठीत राहते। स्त्रीच्या भोवतालचे '' नाच ग घुमा '' चे ताल ओलांडून पुढे जावे असे तिलाही वाटते। अर्थात स्त्री–सन्मान, स्वातंत्र्य समता व मुक्ती हा स्त्री–जीवनाच्या दृष्टीने परिवर्तनवादी, पुरोगामी दृष्टिकोन माधवी देसाईमध्येही दिसून येतो.

(1)''धुळपाटी'' मधील शांताबाईचा स्त्री –स्वांतत्र्य, सन्मान, समानता आणि मक्ती या स्त्रीविषयक वैचारिक व्यूहाचा विचार केला असता त्या स्वयंभूपणाने, समर्थपणाने निर्भयतेने, व्यावसायाभिमुखतेने आणि व्यावहारिकपणाने स्वतःच एखाद्या पुरुषी व्यक्तिमत्वाप्रमाणो जगलेल्या पाहवयास मिळतात. त्यामुळेच त्यांच्या आठवणींमध्ये पुरुष प्रधान संस्कृतीमध्ये स्त्रीजीवनाला सन्मान, स्वांतत्र्य, समता आणि मुक्ती मिळवण्यासाठी करावा लागणारा संर्घष दिसत नाही. कलाविश्वामध्ये त्या वावरत असल्यामुळे कदाचित हे घडले असावे.

(2) कार्यकर्त्या स्त्रियांची आत्मचरित्रातील '' कोसबाडच्या टेकडीवरील मधील अनुताईच्या मते, '' स्त्रीस्वांतत्र्य, समता आणि मुक्ती यासंबंधात शिक्षण, मनाचा मोकळेपणा व पारदर्शकता. ध्येयनिष्ठा निर्माण झाली, तर केवळ लैगिंक आकर्षण शिल्लक राहणार नाही. त्याचा वस्तुपाठ त्या स्वतःच्या विचारातून घालून देत आहेत. मात्र अशी अवस्था निर्माण होण्यासाठी स्त्रियांनी निर्भयपणे व ठामपणे उभे राहिले पाहिजे, असेही त्या सूचित करतात.

(३) दलित स्त्यिांच्या आत्मचरित्रांचा विचार केला असता, 'माज्या जल्माची चित्तरकथा' मध्ये दलित समाजात जन्माला येऊनसुध्दा शिक्षणाची कास धरणा–या शांताबाई पाहवयास मिळतात. 7 वी ची फायनल परीक्षा पास झाल्यानंतर कृष्णाजी कांबळे मास्तर, त्यांच्या मामीच्या विधवा मुलीशी लग्न करतात. त्यावेळी शांताबाई गरोदर असूनदेखील रुढी–परंपरेने आणि नशिबाने जे जीवन त्यांच्या वाट्याला आलेले आहे, त्याला शरण न जाता, न डगमगता स्वतंत्र अस्तित्व सिध्द करण्यासाठी नोकरी करण्याचा निर्धार करतात. अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणा उराशो बाळगूनच शांताबाई त्यांच्या जीवनाचा प्रवास करतात. शिक्षिकेपासून ते शिक्षणविस्तार अधिकारीपदापर्यंत पोहचताना त्यांना नाना त–हेच्या समस्यांना सामोरे जावे लागते. एकूणच दलित समाजात जन्माला येऊनसुध्दा शांताबाईनीं ''स्त्री–सन्मान, स्त्री– स्वांतत्र्य'' या वैचारिक व्यूहाची जोपासणी करुन पुरोगामी विचारसरणीचा पुरस्कार केलेला दिसून येतो.

आदिवासी स्त्रियांच्या आत्मचरित्रांचा विचार करतांना नजूबाई गावित यांच्या ''तृष्णा'' या लेखनाच्या संदर्भात ती एक आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे, तसेच ते एकमेव आदिवासी स्त्रीने लिहिलेले आत्मचरित्र आहे, अशी दोन्ही मते आहेत. त्याच दृष्टीने तृष्णा विचारात घेतले आहे. ''तृष्णा'' मधून नजूबाईंनी स्त्री जीवनाचे वास्तव जीवन मांडताना एका बाजूला स्त्री ही केवळ उपभोगाची वस्तू, अशी धारणा समाजात घर करुन आहे. परंतु त्याचबरोबर पुनर्विवाह. विधवाविवाह, बालविवाह, बहुपत्नीत्व यांचा उल्लेख तसेच आदिवासींच्या स्त्रिया भोगण्याचा हक्क असल्याची मानसिकता नजूबाईंनी उल्लेखित केली आहे. त्यातून जे स्त्रियांचे वास्तव जीवन पुढे येते, त्यावरुन महात्मा फुले, ताराबाई शिंदे, आगरकर, महर्षी शिंदे, महर्षी कर्वे, डॉ बाबासाहेब आंबेडकर या विचारवंतांच्या वैचारिक व्यूहाचा स्पर्श येथील स्त्री– जीवनाला परिणामकारकतेने झालेला नाही, असे म्हणणे क्रमप्राप्त आहे. त्या स्त्रिया आजही पारंपरिक जीवन जगत आहेत.

भटक्या स्त्रियांच्या आत्मचरित्रातील ''तीन दगडाची चूल'' मधील नायिका विमल दारिद्रय व उपासमार यांच्याशी झुंज देताना दिसते. दादासाहेब मोरे यांच्याशो विवाहबध्द झाल्यावर तिच्या जीवनाला कलाटणी मिळते. ती पतीच्या सामाजिक कार्याला हातभार लावते. संघर्षाला सामोरे, जाऊन, उपासमार सोसून परिस्थितीशी मिळते – जुळते घेते. नियतीने मातृत्व तिच्या पदरी घातले नसले तरी दुःख न बाळगता धाकटया दिराच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी घेण्याचा विचार आत्मचरित्राच्या अखेरीस करते.

यावरुन असे म्हणता येईल की, भटक्या स्त्रियांमध्ये सामंजस्याबरोबर सामाजिकतेचे भान आहे. कुटुंब स्थिरतेकडे तिचे लक्ष आहे. स्त्री –सन्मान, स्वातंत्र्य, समता व मुक्ती यासंदर्भात तिची सामंजस्याची भूमिका असते.

अल्पसंख्यांक स्त्यिांच्या आत्मचरित्रांची संख्या बोटावर मोजण्याइतकी आहे. सामाजिक स्थिती पाहता मुस्लिमची स्त्री आजही मोठ्या प्रमाणावर बंदिस्त स्वरुपात वावरते आहे, हे हमी दलवाईसारख्या मुस्लिम सत्यशोधक चळवळीतील कार्यकर्त्याने नजरेस आणून दिले आहे. 'मी भरुन पावले आहे'. ही नायिका किंवा लेखिका मेहरुन्निसा या हमीद दलवाई या कार्यकर्त्यांच्या पत्नी आहेत. त्यांच्या पतीचे मुस्लिम महिलांचे बंदिस्त जीवन किंवा रुढीग्रस्त जीवन बाजूला सारण्यासाठी चाललेले प्रयत्न त्याही समजून घेतात. याचाच अर्थ त्याही पुरोगामी विचार सामंजस्याने स्वीकारतात. मुस्लिम समाजात हे अपवादात्मकतेने पाहावयास मिळत. मुस्लिम महिलांच्या संदर्भात स्त्री–सन्मान, स्वातंत्र्य, समता व मुक्ती हा विचार बाजूलाच राहिलेला दिसून येतो. लोकविलक्षण क्षेत्रातील स्त्रियांच्या आत्मकथनात 'माझी कॅन्सरयात्रा' मधील संगीता प्रारंभीच्या काळात अनुताई वाघ यांच्या ग्राममंगल संस्थेच्या 'दाभोण' या आदिवासी लोकसांठी कार्यरत असेलेल्या प्रकल्पावर काम करत असते. विवाहानंतर 6 महिन्यांनी आणि वयाच्या 23 व्या वर्षी तिला कॅन्सरसारख्या भयानक रोगाला सामोरे जावे लागते.दरम्यानच्या दीड वर्षाच्या कालावधीत तिची झालेली ससेहोलपट तिने आत्मचरित्रात मांडलेली आहे. परमेश्वर कृपेने उपचारांनतर नवजीवन प्राप्त झाल्यानंतरही तिचे संपूर्ण जीवन केवळ संसारात अडकून न ठेवता समाजकार्यासाठी वाहून घेण्याचे ती ठरविते.

थोडक्यात शारीरिक दृष्ट्या दुर्बल झालेल्या, कॅन्सरसारख्या रोगाने पछाडलेल्या स्त्रियांना टाकाऊ पदार्थासारखी वागणूक प्रचलित समाजात दिली जाते. याविषयी तिचे मन पेटून उठते.

सर्वसामान्य स्त्रियांच्या आत्मकथनातील ''घर–अंगण'' मधील इंदूमती लिमयेंच्या समस्यापूर्तीतून सामाजिक जाण व्यक्त झालेली पाहावयास मिळते. स्त्री –सन्मान, स्वातंत्र्य, समता व मुक्ती याविषयीचे थेट विचार या आत्मचरित्रात प्रकट होत नाहीत, तर स्त्री–सन्मान, स्वातंत्र्य, समता आणि मुक्ती यासंदर्भात स्त्रीचा विचार करताना स्त्री–पुरुषांच्या सामंजस्यपूर्वक, संवेदनशील समन्वयाने कुटुंबसंस्थेत हा विचार रुजवता येईल याची नकळत वस्तूपाठ ती देते.

तो आला, तो रमला या आत्मचरित्रातील अनसुया भारतीय पारंपारिक निष्ठेने पतीनिधनानंतर तारुण्यावस्थेत वैधव्याचे चटके झेलत, निष्ठेने आपल्या मुलाबाळांसाठी घराबाहेर पडते आणि बालवाडी शिक्षिका म्हणून सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा प्रयत्न करते , तर काटे आणि गरे हे आनंदी सहस्त्रबुध्दे यांचे आत्मचरित्र म्हणजे एका स्त्रीने सहज दारिद्रय झेलीत स्वातंत्र्य, चळवळ, स्त्री–शिक्षण, मुलांचे शिक्षण आणि कौटुंबिक जीवन सावरण्यासाठी केलेल्या अथक परिश्रमाचा दस्तऐवज आहे.

वरील तीनही आत्मचरित्रे विचारात घेतली असता असे म्हणता येईल की, सामान्य जीवन जगणा–या स्त्रिया कुटुंबाचे स्थैर्य राखत आपापल्यापरीने अतिशय सामंजस्याने सामाजिक परिवर्तनाच्या प्रवाहात मिसळून जाऊन जीवन व्यतीत करतांना दिसतात.

सारांश, सांस्कृतिक परिप्रेक्ष्यात स्त्रीच्या वाट्याला आलेले जे डावललेपण आहे, ते विचारात घेऊन महात्मा फुले, ताराबाई शिंदे, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी शिंदे, महर्षी कर्वे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासारख्या विचारवंतांनी स्त्री– सन्मान, स्वांतत्र्य, समता व मुक्ती या वैचारिक व्यूहाच्या माध्यमातून आपले विचार मांडले आहेत. वाड्मयेतिहासाचे अवलोकन केले तर आत्मचरित्रांची संख्या मोठी आहे. त्यामुळे आत्मचरित्रांचे गट करुन प्रतिनिधिक स्वरुपात आत्मचरित्रांचा विचार करुन निष्कर्षाप्रत येणे अपेक्षित होते. माझा हा प्रयत्न गत 25 वर्षात महाराष्ट्रातील विचारवंतांच्या विचाराने प्रेरित झालेल्या महिलांच्या कसे परिवर्तन

होते ? याचा अनुभव आपणास स्त्रियांच्या आत्मचरित्रातून येतो असे मला वाटते. आपल्या आत्मचरित्रांमधून कळत नकळत या वैचारिक व्यूहाप्रमाणे घडणारे सामाजिक परिवर्तन त्यांच्याकडून उभे झाले आहे. या आत्मचरित्रांमधून स्त्री–सन्मान, स्वातंत्र्य, समता व मुक्ती वैचारिक व्यूहाप्रमाणे घडणारे परिवर्तन उलगडत आहे.

## संदर्भ :–

1. फडके य.दि. – म. फुले समग्र वाड्मय (संपा.) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, नवीन प्रशासन भवन मंत्रालयासमोर, मुंबई. पाचवी आवृत्ती , नोव्हेंबर 1991, पृष्ठ –498
2. तत्रैव – पृष्ठ 15 (प्रस्तावना)
3. शिंदे ताराबाई (संपा) स्त्री पुरुष तुलना, विलास खोले, प्रतिमा प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती, आॅगस्ट 1997 पृष्ठ –101
4. तत्रैव – पृष्ठ 105
5. आगरकर गोपाळ गणेश– सुनंदा देशपांडे, कुलकर्णी दामोदर दिनकर, श्रीविद्या प्रकाशन, पुणे. प्रथम आवृती 15 मे 1983.
6. कदम डॉ. शंकरराव, महर्षी विठ्ठल रामजी शिंदेः साहित्य आणि कार्य – सौ. मुलाटे उषा, स्वरुप प्रकाशन औरगाबाद पृ. आ. जुलै 2000 पृ. 165.
7. आठलेकर मंगला, महर्षी ते गौरी. स्त्री –स्वातंत्र्याची वाटचाल– दिलीप माजगावकर, राजहंस प्रकाशन, पणे. 30 द्वितीय आवृत्ती जुलै 2000, पृष्ठ– 24.
8. कुरुदंकर नरहर, मनुस्मृती – श्याम दयार्णव कोपर्डेकर, इंद्रायणी साहित्य, 273, सदाशिव पेठ ,पुणे 30 पृष्ठ – 77
9. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महिलांकरिता भारतीय राज्यघटनेअंतर्गत हमी। (कॅलेंडर) विद्रपाने, Printed at India offset press, Mayapuri, New Delhi-December 2001.